# मुंबई विद्यापीठ, मुंबई

मुंबई विद्यापीठाच्या “कुलगुरु” पदासाठी शोध समिती अर्ज मागवित आहे.

मुंबई विद्यापीठाची स्थापना १८५७ साली झाली असून हे भारतातील नामवंत व जुन्या विद्यापीठांपैकी एक आहे. विद्यापीठाचे कार्यक्षेत्र फोर्ट आणि विद्यानगरी (सांताक्रुझ) येथे असून विद्यापीठाची उपकेंद्रे ठाणे, रत्नागिरी आणि कल्याण येथे आहेत. सद्य:स्थितीत मुंबई विद्यापीठामध्ये ५४ विभाग/संस्था/केंद्र/विशेष उपक्रम केंद्रे, पाच स्वायत्त विभाग, एक घटक महाविद्यालय, दोन आदर्श महाविद्यालये व चार समुदाय महाविद्यालये (Community Colleges) कार्यरत आहेत. या विद्यापीठाच्या अधिकार क्षेत्रामध्ये मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग असे एकूण सहा जिल्हे आहेत आणि सदर जिल्हयांमधील जवळपास ७७० महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्नित आहेत, त्यापैकी ९ स्वायत्त महाविद्यालये असून ७ लाखांपेक्षा जास्त विद्यार्थी ज्ञानार्जन करीत आहेत. विद्यापीठाबाबतची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या **www.mu.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मा. कुलपती व राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांनी कुलगुरु पदासाठी सुयोग्य व्यक्तींच्या नावाची शिफारस करण्यासाठी **डॉ. के. कस्तुरीरंगन, अध्यक्ष, नॅशनल एज्युकेशन पॉलिसी, रामण रिसर्च इंन्स्टिटयुट, सी. व्ही. रामण ॲव्हेन्यु, सदाशिवनगर, बॅंगलोर – ५६० ०८०** यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय शोध समिती स्थापन केली आहे. या समितीमध्ये **डॉ. श्याम लाल सोनी, संचालक, नॅशनल इंन्स्टिटयुट ऑफ टेक्नोलॉजी, उत्तराखंड, जि. पौवरी (गडवाल), श्रीनगर, उत्तराखंड** आणि **श्री. भुषण गगराणी, उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई** यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

उपरोक्त शोध समिती, दि. २७ मे, २००९ च्या शासन आदेशानुसार ज्या व्यक्तीकडे कुलगुरु पदाकरिता आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव आहे व जे आव्हानात्मक कार्य स्विकारण्यास इच्छुक आहेत अशा उच्च विद्याविभुषित व्यक्तींकडून अर्ज मागवित आहे. या पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव, इष्टतम अनुभव आणि कौशल्ये व नैपुण्ये याबाबतची आवश्यक ती तपशिलवार माहिती या अर्जाच्या नमुन्यासोबत मुंबई विद्यापीठाच्या **www.mu.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

वर नमूद अर्जासह उमेदवार व्यक्तींनी सदर पदाच्या उमेदवारीबाबतचे दोन पानी समर्थन आणि विद्यापीठाच्या उत्कर्षाबाबतची दुरदृष्टी व्यक्त करणारी दोन पानांची टिप्पणी आणि त्यांच्या कामकाजाशी सुपरिचित असलेल्या तीन नामांकित व्यक्तींची नावे व संपर्काचे तपशील नमूद करुन अर्ज सादर करावेत.

विविध **संस्था**सुध्दा समितीच्या विचारार्थ योग्य व्यक्तींचे नामांकन करु शकतात.

अर्ज/नामांकने विहित नमुन्यात, चार प्रतीत व त्याचसोबत संगणकीकृत प्रत (soft copy) नोडल ऑफिसर यांच्याकडे दि. १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी सायंकाळी ठीक ५.३० वाजेपर्यंत किंवा तद्पूर्वी पोहचतील अशा रितीने खालील पत्त्यावर पाठवावेत. सदर तारखेनंतर आलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत.

**नाव** : **श्री. रविंद्र कुलकर्णी**
**अप्पर जिल्हाधिकारी**

**पत्ता** : **सिडको लिमिटेड,**
**निर्मल, दुसरा मजला,**
**नरीमन पॉईट, आयनॉक्स थिएटरजवळ,**
**मुंबई — ४०० ०२१ (महाराष्ट्र)**

**मोबाईल नं.** : **०९४२२०३१९२१**

**ई—मेल आयडी** : **ravindra_kool@yahoo.com**

शोध समितीस आवश्यकता भासल्यास संक्षिप्त निवड सूचीतील (short listed) उमेदवारांना व्यक्तीशः संवादासाठी आमंत्रित करण्यात येईल.

ठिकाण : मुंबई — अध्यक्ष
दिनांक : १० जानेवारी, २०१८ — शोध समिती